**प्रसिध्दी पत्रक** दि. १२.०५.२०२६

**आरोपी लोकसेवक** - १) अशोक दादाराव करवर वय ३४वर्ष पद:-पोलीस अंमलदार बक्कल नंबर ४१७ नेमणूक :- पो स्टे कळंब जिल्हा धाराशिव वर्ग ३ रा.दत्त नगर कळंब २) सिद्धेश्वर प्रकाश शिंदे ३७ वर्ष पद:-पोलीस अंमलदार बक्कल नंबर १३८९ नेमणुक:-पो स्टे कळंब जि धाराशिव वर्ग ३ रा.शिवाजीनगर, कळंब

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | धाराशिव |
| **गुन्हा दाखल पोलीस ठाणे** | कळंब ता.कळंब जि.धाराशिव येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| **आलोसे यांचे नाव** | १) अशोक दादाराव करवर वय ३४वर्ष पद:-पोलीस अंमलदार बक्कल नंबर ४१७ नेमणूक :- पो स्टे कळंब जिल्हा धाराशिव वर्ग ३ रा.दत्त नगर कळंब २) सिद्धेश्वर प्रकाश शिंदे ३७ वर्ष पद:-पोलीस अंमलदार बक्कल नंबर १३८९ नेमणुक:-पो स्टे कळंब जि धाराशिव वर्ग ३ रा.शिवाजीनगर, कळंब |
| **लाच मागणी रक्कम** | ३६,०००/- रु लाचेची मागणी |
| **लाच स्विकृती रक्कम** | ३६,०००/- रु लाच रक्कम स्विकारली |
| **सापळा अधिकारी**<br><br>**तपास अधिकारी** | श्री. बाळू संपती जाधवर वय ४७ वर्ष, पद पोलीस उप अधीक्षक ला प्र वि कार्यालय, जालना<br>श्री.विजय वगरे, वय - ३९ वर्ष, पद पोलीस निरीक्षक,ला.प्र.वि.धाराशिव. |
| **लाच मागण्याचा हेतु** | यातील मुळ तक्रारदार यांनी दि.१०/०५/२०२६ रोजी तक्रार दिली की, तक्रारदार यांचा कळंब जि धाराशिव येथे रिलॅक्स स्पा सेंटर चा व्यवसाय असून तो सुरळीत चालू ठेवण्यासाठी पोलीस अंमलदार सिद्धेश्वर शिंदे हे पोलीस निरीक्षक यांचेसाठी २०,०००/- रू व पोलीस अंमलदार अशोक करवर हे दुय्यम अधिकारी यांचेसाठी २०,०००/-रू अशी एकून ४०,०००/-रू हप्ता म्हणून लाचेची मागणी करत आहेत यावरून तक्रारदार यांनी अधिकारी यांना भेटण्याची दोन्ही लोकसेवकांकडे इच्छा व्यक्त केली असता लोकसेवकांनी तक्रारदार यांना सांगितले की तू जर अधिकारी यांना भेटलास तर ते तुझा स्पा चा धंदा बंद करून तुझ्यावर कारवाई करण्यास लावतील .तुझा धंदा सुरळीत चालवायचा असेल तर आम्हाला हप्ता द्यावा लागेल व त्या विषयी जर काही बोलायचे असेल तर ते आमच्या दोघांशी बोलावे लागेल. आशा आशयाची तक्रार जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे दिली. |
| **थोडक्यात माहिती** | वरील तक्रारीचे अनुषंगाने पडताळणी कामी दिनाक १०/०५/२०२६ रोजी तक्रारदार हे पंच यांचे सोबत बागवान चौक कळंब येथे गेले असता तेथे लोकसेवक सिद्धेश्वर शिंदे यांनी पोलीस निरीक्षक यांचेसाठी २०,०००/-रू व लोकसेवक अशोक करवर यांनी दुय्यम अधिकारी यांचेसाठी १६,०००/-रू असे एकूण दोघांनी मिळून ३६,०००/- रु लाचेची मागणी करून ती स्वीकारण्याचे पंचासमक्ष कबुल केले.सदर पडताळणी वरुन सापळाकरवाई आजमावली असता लोकसेवक अशोक दादाराव करवर, वय ३४ वर्ष,पोलिस अंमलदार बक्कल नंबर ४१७ नेमणूक पो स्टे कळंब जि धाराशिव वर्ग ३ याना तक्रारदार यांचेकडून पंच यांचे समक्ष ३६,०००/-रु लाच घेताना सापळा पथकाने कळंब शहरातील होळकर चौकातुन तांदळवाडी कडे जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूला असलेल्या हॉटेल गुलमोहर बिर्याणी हाऊस समोर तक्रारदार यांचे स्विफ्ट कार मध्ये लाचेचे रकमेसह ताब्यात घेतले वगैरेवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

सदरची कारवाई मा.माधुरी केदार कांगणे , पोलीस अधीक्षक ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर, श्री.शशिकांत सिंगारे, अपर पोलीस अधीक्षक, ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर, यांचे मार्गदर्शनाखाली श्री.बाळू संपती जाधवर, पोलिस उप

Scanned with OKEN Scanner

अधीक्षक, पोहेकॉ/ गजानन घायवट, पो.अंमलदार मनोहर भुतेकर ,गणेश चेके, संदीपान लहाने, गजानन कांबळे,चालक पी हवा भालचंद्र बिनोरकर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना यांनी केली आहे .

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आव्हान करण्यात येते की,भ्रष्टाचार संबंधी माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाच लुचपत प्रतिबंधक विभाग , धाराशिव यांचेशी संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| **संपर्क पत्ता** | - लाचलुचपत प्रतिबंधक विभाग , धाराशिव. |
| **संकेत स्थळ** | - 1.acbwebmail@mahapolice.gov.in<br>2.dysposmanabad@gmail.com |
| **ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन** | - acbmaharashtra.net |
| **टोल फ्रि क्रमांक** | - १०६४ |
| **दुरध्वनी क्रमांक** | - ०२४७२-२२२८७९ |
| **पोलीस अधीक्षक , लाप्रवि , छत्रपती संभाजीनगर** | - ९०११०९२७७७ |
| **पोलीस उप अधीक्षक , लाप्रवि , धाराशिव** | - ९०४९५१९८३३ |

Scanned with OKEN Scanner